# आरंभ...

साहित्य प्रतिष्ठान

## एक नवी वाटचाल



# साहित्य प्रतिष्ठान

## पुस्तकाचे नाव : आरंभ...एक नवी वाटचाल

लेखक: शशांक नवलकर
मांडणी व सजावट : सोनल मानकर
ई-पत्ता : njoybuzz@gmail.com

© शशांक नवलकर

( हे पुस्तक विक्री साठी नसून कोणत्याही प्रकारे या पुस्तकाची विक्री किंवा कमर्शिअल वापर करण्यापूर्वी लेखक आणि प्रकाशकांची परवानगी आवश्यक आहे )

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
ई-पत्ता : esahity@gmail.com
इतर ई पुस्तकांसाठी आणि मासिकांसाठी www.esahity.com

लेखक :
शशांक नवलकर
njoybuzz@gmail.com
(+91-9987718919)





आर्ट वर्क :
सोनल मानकर
sonalmankar@gmail.com

काही कथा खूप विचित्र असतात.विचित्र असतात पण त्यांची चित्र अनेक असतात ,कोणत्या चित्राला कोणी कसे अन का पहावे हे त्या पाहणा-यावरच अवलंबून. मी काय फक्त एक लेखक. मी अन माझी (ही लिहीलेली) कथा, तुम्ही वाचावीत हीच सदिच्छा. प्रत्येक कथेला नायक असतो,नायिका असते,प्रेम प्रकरण अन विरह असतो..त्या प्रेमी युगुलाचे मिलन-अलग होणं. 'अहो हिंदी चित्रपट ची स्क्रिप्ट नाहिए ही,कथा आहे ती पण मी लिहीलेली'.

तर या कथेचा नायक,नायिका अन इतर पात्र मी काही सुरुवातीला सांगणार नाही. तुम्ही ही कथा वाचा अन माला सांगा कशी वाटली ते. हा माझा कथा लिहीण्याचा पहिला-वहिला प्रयत्न आहे त्यामुळे तुम्ही ही कथा वाचाल अशी मला आशा आहे.

'कधी कधी आयुष्यात सर्वच काही मनासारखं होत नाही. तडजोड ही असतेच.कीतीही धडपडलं तरी मिळायचं ते मिळणारच आणि नाही ते नाहीच.' नेहमी मी या गोष्टीचा विचार करत असतो, का कुणास ठाऊक या तीन वाक्यांचा संदर्भ माझ्या आयुष्यात कुठेतरी कधीतरी लागत असावा.काय माहित काय अर्थ लागेल या सगळ्याचा. असो आपलं आयुष्य मस्त चाललय चालू देत. तोच वैदेहीचा sms आला. 'addy,green park 8pm dinner ani gadhadya.. nahi aalas na tar tujhi khair nahi lakshat thev'. काय बिशाद माझी हिला नाही म्हणायची, नाव वैदेही मुजुमदार माझी बालमैत्रीण . खूपच स्वप्नाळू मुलगी. एखादी गोष्ट मिळवायची म्हटली तर ती गोष्ट मिळवल्याखेरीज गप्प नाही बसायचं असं हिचं attitude.



दिसायला गोंडस म्हणा , ठिकठाक म्हणा किंवा एकदम फटाकडी म्हणा माझ्यासाठी ती नेहमीच बेस्ट. चक्क खेळता बागडता आम्ही इतके मोठे होऊ अन अजुन एकत्र असू , कधी वाटलं नव्हतं . पुढे दोघांचं नशीब एकमेकांना कुठे घेऊन जाईल दोघांपैकी कोणालाच माहित नाही. 'अर्र्रे तुम्हाला मी माझी ओळख करुन दिलीच नाही ना .. मी अद्वैत , अद्वैत देव .

संध्याकाळची साडे-सातची वेळ मी मस्त तयार होत होतो,तितक्यात मित्राचा फोन आला. हा मित्र म्हणजे साधा सुधा मित्र नव्हे तर माझा 'लंगोटी यार' सुधीर. त्याला प्रोजेक्ट ची फाईल हवी होती. त्याचे काम महत्त्वाचे होते अन माझे जाणे सुद्धा. 'एकाच वेळी दोन विचार आले की खरच खूप वाट लागते यार. विचार करता करता अन घरुन निघता निघता आठ वाजले . बाहेर मस्त पाऊस पडत होता....इतका मस्त की मी काही क्षण पाहतच राहीलो त्या सुंदर वातावरणाकडे. बाईक घेतली काढायला तर बाहेर मेन रोडवर ट्राफिक जाम. घडाळ्याचे काटे फिरत होते. आठ वाजून गेले होते. 'सुध्या' ला फाईल द्यायची होती , वैदेहीला भेटायचं होते, उशीर झाला म्हणून वैदेहीला उत्तर द्यायचे होते....फाईल आणायला का जमली नाही ह्याचे स्पष्टीकरण तयार करायचे होते...... इतके प्रश्न इतक्या घटना अन त्यात अडकलेला......

हम्म्मम्म्म.....मी....


होटेल जवळ पोहोचलो तेव्हा जोरदार पाऊस पडत होता. भरपूर पाऊस पडत होता त्यामुळे रस्त्यावर वर्दळही कमी दिसत होती. नशीब हातात फाईल नव्हती , नाहितर फाईलीसकट सुधीरने मलाही वाळत घातले असते....बरं झालं. 'अरे , वैदेही कुठे ?'........



नुकताच आलो (उशीरा!!!) पण तिचा कुठेच पत्ता नाही. खिशातनं मोबाईल काढला तर तिचे सात मिस्स्ड कॉल्स होते, मी मनातल्या मनात म्हणालो चला माझे लागले आता.... तेवढ्यातच मागून अलगद कोणीतरी हात ठेवला . इतका गार स्पर्श होता तो मी दचकून मागे पाहिले... वैदेही होती, चिंब भिजलेली . खर सांगू नेहमी पेक्षा जास्त देखणी दिसत होती ती आज. माझ्यावर खेकसून मला विचारले .. 'नालायक! हालकट ! होतास कुठे इतका वेळ.....

चला आता माझा क्लास चालू , जवळ जवळ पंधरा मिनिटे मी आमच्या वैदेही बाईंचं लेक्चर ऐकले, मग मीच तिला ओरडलो. 'गधडे एवढी भिजली आहेस चिंब आणि अजुन भिजायची हौस आहे का तुला. चला आत जाऊया.' ह्या सगळ्यात नऊ वाजुन गेले कळलेच नाही. आत होटेल मध्ये गेलो मी माझे जॅकेट काढले अन तेथे ठेवलेल्या अनेक छत्र्यांसोबत बादलीवर ठेवून दिले, पण वैदेहीचे काय ती तर पूर्ण भिजलेली होती . ती काहीच काढू शकत नव्हती. मग मी तिला विचारले वैदू काय करायचे आता?. मला म्हणाली 'असच बसू , ज्यांना बघायचे असेल ते बघतील नाही बघायचं असेल तर नाही. आपण आपली संध्याकाळ का बरं खराब करायची.' अंदाज पण भारी आहे या पोरीचा.

आम्ही टेबल बघितले कुठेच रिकामे दिसले नाही . सगळे तिच्याकडे टकामका बघत होते. शेवटी वाट पाहून पाहून कंटाळा आला होता , तिची पण अशीच काहीशी अवस्था झाली असावी. मी मग वैदेहीला जाऊन कानात म्हणालो, 'ए चल आपण दुसरीकडे जाऊया.' पावसाच्या ह्या सुंदर वातावरणात आता तिचा हिरमोड करणे मला अशक्य होते. तिने माझ्याकडे दोन मिटे पाहिले , गालातल्या गालात हसली आणि म्हणाली 'चल , आय हॅव्ह अ बेट्टर प्लेस फॉर यू....'.



माझी बिल्डिंग आणि वैदेहीची बिल्डींग ह्यात फक्त एका इमारतीचं अंतर अन तिच्या घरची बालकनी माझ्या घरच्या बालकनीच्या अगदी समांतर त्यामुळे फोनवर कधी गप्पा मारायच्या झाल्या आणि त्या झाल्यावर मग एकमेकांना बाय करायचं झालं की दोघांनाही एकमेकांना बघायला मिळायचं, त्यामुळे आजुबाजुला काय कुठे होते हे सर्व मला माहित होते. दोन वर्षापूर्वीच इकडे आलो रहायला पण सगळं आता आपलसं झाले आहे. हा तर ही बया मला कुठेतरी घेऊन जात होती. काय तर म्हणे 'बेट्टर प्लेस'. हे ग्रीन पार्क थ्री स्टार होटेल होते तिकडे न जाता मला कुठे घेऊन जाते आहे ही पोर काय माहित.

पाऊस आता ब-या पैकी कमी झाला होता. मी सुद्धा जॅकेट घातले नव्हते. असच पावसाची मजा घेत गप्पा मारत आम्ही जात होतो. ती मला सांगत होती, 'आठवतय **addy** आपण लहान असताना एक पडकं घर होतं तिकडे आपण जाऊन खेळायचो....' , जवळ जवळ २० वर्षापूर्वीची आठवण करून दिली ह्या पोरीनं . काय पण हिची मेमरी. अहो चक्क त्याच ठिकाणी मला तिनं आणलं आता तिकडे एक छोटासा ढाबा आहे. गर्दी तिकडे खूप असते . जे फाईव्ह स्टार होटेल मध्ये मिळतं त्याहूनही जास्त रूचकर खाणं इथे मिळतं अस ती मला सांगत होती.आम्ही तिकडे गेलो . प्लास्टिकची टेबलं अन खुर्च्या होत्या. जास्त करून कपल्सच होती आजुबाजुला.

आम्ही दोघं बसलो समोरा समोर. भिजलेली वैदेही आज नेहमी पेक्षा खूपच वेगळी दिसत होती . मी विचारले , 'काय ग किती वेळ वाट पाहत होतीस माझी' , मला म्हणाली ' अर्धा तास (नाक मुरडत)
**'sorry dear , it was heavy traffic...**त्यामुळेच तर मला उशीर झाला ग . मग आमच्या गप्पा सुरू झाल्या . आज मी वैदेहीला पहिल्यांदाच डेटवर घेऊन आलो होतो आणि ते पण भर पावसात आणि एका ढाब्यावर...सही ना. ढाबा म्हंटल्यावर वेज फूड हा प्रकार नसतोच. मग काय आम्ही चिकन खायचं ठरवलं.....



इकड-तिकडच्या गप्पा चालू होत्या...तितक्यात तिनं विषय काढला काय राव मग पुढे काय विचार आहे? मी मनातच म्हंटलं , 'आईला....मी विचारायच्या अगोदरच ही मला प्रपोज करतेय की काय!!!'. सर्वत्र मस्त पावसाचे वातावरण , थंड वारा वाहत होता अन ह्या प्रसंगी माझ्या कपाळावर घाम.....

तिने मला हळूच चिमटा काढला . मला एकदम दचकल्यासारखं झाले, मला हलवून तिने विचारले....काय रे आहेस कुठे...लक्ष आहे का तुझं. मी थोडासा हसलो आणि म्हणालो , 'तुझे विस्कटलेले केस , ओले झालेले ओठ आणि.....काही नाही अग तुझ्याचकडे पाहतोय'. मग मला एकदम स्ट्रेट उत्तर आले तिच्याकडून.... ' काय रे आजुबाजुला कोणी मुलगी दिसली नाही तर सरळ माझ्यावर हल्ला... अन हसायला लागली. तिचं हसणं आज थोडसं 'लाकड' होतं, आजुबाजुचे सगळे तिच्याकडे बघत होते. मी म्हणालो हो हो कळला हो तुझा विनोद.

आमचं खाणं आले. आम्ही बोलत होतो. एक घास आत गिळला तितक्यात वैदू ने विचारले..... 'काय रे दोन टेबलं सोडून बसलेल्या त्या कपल पैकी तो माणूस तुला किंवा मला ओळखतो का रे ?'. आधी मी न बघता बोललो असेल कोणतरी आपल्याला काय .....lets just enjoy our food na. कदाचित तुझ्या ओळखीचे कोणीतरी असावे , त्याच्या बरोबर बसलेली मुलगी खूप क्यूट आहे रे'. आता मला मागे वळून बघितल्या शिवाय गत्यंतर नव्हते. हिची ही ट्रिक नवीन नव्हती.

मागे पाहिले .... घश्यातला घास अडकूनच राहिला....समोर सुधीर आणि विशाखा बसलेले होते अन सुधीर माझ्याकडे एका विक्षिप्त नजरेने पाहत होता. सुधीरच्या फाईल बद्दल मला लक्षातच राहिले नाही ,मोबाईल बघितला तर वैदेहीच्या ७ मिस्स्ड कॉल्स नंतर अजुन एक नंबर होता .... सुधीरचा.....



वैदेहीचा एक प्रश्न संपला होता पण अजुन एक प्रश्न उरला होता सुधीरला फाईल द्यायची होती...मी आणि वैदू एकत्र बसलो होतो अन समोर सुधीर आणि विशाखा होते...दोघांनाही मला माझ्या न येण्याचं कारण द्यायचे होते अन त्यांनी मला अचानक वैदेही बरोबर पाहिले त्या बद्दलचे एक्स्प्लेनेशन. इतक्याश्या काहिश्या क्षणात मला इतके सारे करायचे होते... काय यार पुन्हा तेच .....

मी हलक्या आवाजात वैदेहीला म्हणालो अग तो सुधीर आहे. तुला मागे मी सांगितलं होते ना माझा खूप जुना मित्र आहे करून. ती 'हम्म' च्या स्वरात म्हणाली 'अच्छा हाच का तो, दिसायला भारी आहे म्हणा पण not like you....'अन हलक्या आवाजात हसायला लागली. काय पण पोरगी आहे असल्या प्रसंगाला हिला विनोद सुचतात. मी जेव्हा मागे वळून पाहिले तेव्हा सुधीर ने माझ्याकडे अन पुन्हा त्याने त्याचे लक्ष विशाखाकडे वळवले. मी मागे बघत होतो तेव्हाच वैदेहीने माझी मान तिच्याकडे वळवली...अन म्हणाली ' गधड्या माझ्याबरोबरच आलायस नं'...

थोडावेळ दोघेही काहीच बोलत नव्हतो. मग तिनेच बोलायला घेतले. काय रे प्रत्येक वेळी तू असल्या विचित्र प्रसंगांना का बरं बळी पडतोस. मग मला ही मूड आला.. मीही सुरु केले बोलायला. 'तू बरोबर असतेस ना तेव्हा सगळच छान असतं, नाहीतर...' 'नाहीतर काय???? लगेच बडबडली. 'तुला आता काय सगळं वेगळं सांगायला लागते का. 'हो...गपचुप सांगायचं सगळं कळलं ना नाहितर तुला माझ्याकडनं फटके....'आणि पुन्हा हसायला लागली. 'वैदू आपल्या मैत्रीला आज २० वर्षं पूर्ण झाली म्हणून ती साजरी करायला आपण आज आलो आहोत ना हे तुला चांगलच लक्षात आहे आणि शहाणे प्लानही तुझाच ना.' 'हो.... खरय तुझं पण अजुन एक कारण आहे.
'काय अजुन एक कारण ????'काही विषय निघेल तितक्यातच मागून हाक...'काय अद्वैत साहेब थ्री-स्टार फाइव्ह-स्टार होटेलांत जाणारे तुम्ही आज चक्कं ढाब्यावर!!!'.... हा आवाज सुधीरचा होता ........



काही क्षण असं झाले की जणू माझी वाचाच गेली की काय....श्वास आत टाकत बोलायला जाईन तितक्यात आमच्या मॅडम बोलायला चालू. 'हाय सुधीर , सुधीरच नाव आहे ना.' तो टेबलाजवळ येऊन बसला आणि बोलू लागला 'हो, मी सुधीर देशपांडे. 'हाय मी वैदेही मुजुमदार. मी आपला गप्प काय बोलू सुचेना. शेवटी मी धाडस केले बोलायचे..'अरे सुधीर तू इकडे, तुला कामानिमित्त बाहेर जायचे होते ना. सुधीर ने माझ्याकडे मान वळवली अन पुढे जे तो बोलला त्यावरून मी खूर्चीवरून गडगडून पडेन अशी अवस्था झाली माझी. तो म्हणाला 'अरे काम होते खरे ते cancel केले मी , तुझा फोन ठेवलाच की विशाखाचा फोन आला आणि म्हणाली आजच्या सगळ्या मीटींग्ज रद्द कर आणि माझ्याबरोबर बाहेर चल'. 'no more excuses" आणि तुला माहित आहे ना विशाखा कशी आहे ते. मग मला जावच लागलं तिच्यासोबत.'पण,तू आणि वैदेही...आज एकत्र इथे..हे मला नाही सांगितलस'. तेवढयात वैदेहीने एंट्री मारली आमच्या त्या so called talk मध्ये, 'काय नाही सांगितलस?'.......

गेल्या २० वर्षांचा रेकोर्ड म्हणता येईल, आजपर्यंत वैदेहीपासून मला कधी काहीच लपवणं जमलच नाहिए आणि खोटं बोलणे तर अजिबात नाही. त्यामुळे मी बोलायला सुरू केले....काही गत्यंतर नव्हतेच म्हणा त्याशिवाय. अन स्वतःच हसलो. 'अग, हे दोघं ना खूप वर्षापासनं एकत्र आहेत आणि येत्या काळात लग्न करणार आहेत. commited पण झाले हल्लीच. तुला आज सांगणार होतो पण मी सांगायच्या आधीच हे असे सर्व घडले त्यामुळे'.... माझे बोलणे पूर्ण व्हायच्या आधीच तिने बोलायला घेतले. ' गधड्या तू ना मूर्खच आहेस, मुलीशी बोलताच येत नाही तुला. प्रत्येक वेळी मलाच बोलावं लागते. 'विशाखा कशी आहेस तू'. मग माझी टयूब पेटली आता ह्या दोघांना कसतरी जायला सांगायला हवं नाहितर माझी काही खैर नाही. मी काही बोलायला जाणार तितक्यातच सुधीर बोलला.... 'चल अद्वैत आम्ही निघतो तिला पण उशीर होईल घरी पोचायला. आपण बोलू नंतर.जाता जाता माझ्या कानाजवळ येऊन बोलून गेला..... 'वहिनी खूप सुंदर आहेत हं' मी थोडासा हसलो अन मला त्या दोघांनी बाय केलं..........




'तुझ्या मित्राला काही manners नावाचा प्रकार आहे की नाही . आपली एका महत्वाच्या विषयावर चर्चा चालू होती आणि मध्येच येऊन टपकला...मूर्ख कुठला. 'अगं गेले ते आता आपण बोलूया ना....' 'राव घड्याळ्यात वाजलेत किती पाहिलेत का? अजुन उशीर झाला तर आमचे पिताश्री आम्हास जिवंत सोडत नाहीत पहा.....उठा आता.' 'वैदू im sorry dear". 'तू ना आता गप्पच राहा.... तू का sorry बोलतोयस आता. तुला नेहमीच गप्प राहायची सवय असते ना. असाच रहा गप्प मग जेव्हा खरच खूप उशीर होईल ना तेव्हा पण काहीच बोलू नकोस गप्पच रहा.....' आणि पाय टापत निघाली . आम्ही ढाब्यातून बाहेर पडलो. पाउस थांबला होता मी तिच्याशी बोलायला गेलो तेवढ्यात ती म्हणाली 'मी निघते आपण नंतर बोलू , बाय' अन रिक्षा पकडून ती निघून गेली .

क ाय यार आता ही पण माझ्यावर रागावली . असं वाटत होतं की जावं आणि त्या दोघांचा गळा दाबावा' पण तेही शक्य नाही कारण सुधीर आहे माझा 'best friend'. आणि मग वैदेही......???

'काय यार .....कशी-कशी लोकं नशीब घेऊन येतात , कसं-कसं कोण कोणाला मिळतं अन मी असा कसा...'वैदेही निघून गेली होती सर्वत्र थंड वारे वाहत होते. आकाशात विजा अन ढगांमध्ये एकदम जुगलबंदि राकंड चालू होती. and guess what पाऊस पुन्हा चालू. त्या प्रसंगाच्या भरात मी माझे जॅकेट कुठेतरी विसरलो होतो. नाईलाज, मला पावसात भिजत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. बाईक स्टार्ट करायला गेलो तर लक्षात आले बाईकची चावी जॅकेटमध्येच .

'वा....काय मस्त संध्याकाळ होती ना...स्वतःच स्वतःला ओरडत होतो मी लोकं पाहत होती माझ्याकडे आणि हसत होती. मग काय आमची वारी घराकडे पावसात मस्त भिजत. जवळ जवळ पाऊण तास मी चाललो अन घराजवळ पोचताच तिकडच्या जवळपासच्या एका बाकड्यावर बसलो. पाऊस ब-या पैकी कमी झाला होता. रात्रीचे साडे-बारा वाजले होते, विचार करत होतो... इतका की कधी मी शाळेतल्या बोर्डाचा पेपर लिहितानाही केला नसेल. 'क्या करे समय समय की बात है.' वैदेहीला काहीतरी सांगायचे होते, सुधीरला काहीतरी सांगायचे होते, अरे यार!!! मलाही ह्या दोघांना काहीतरी सांगायचे होते त्याचे काय??? प्रत्येक जण आपलेच बघतो अन मी ?... असाच बसून दोघांचा विचार करतोय. उठलो अन थेट घरी निघालो तितक्यातच मोबाईल लुकलुकला , वैदेहीचा मेसेज होता........



'addy im sorry, me jara jastach over react kele na" , माफ करशील ना रे. तुला माहितिए ना रे माझी लहानपणापासूनची सवय आणि मी तुझ्याजवळच माझा राग व्यक्त करू शकते रे तुझ्यापेक्षा जास्त मला कोणी समजून घेऊ शकतच नाही .... in fact.....some text missing".

काय फालतूगिरि आहे बघा...पुन्हा हिला काहितरी सांगायचे होते अन तो एसएमएस आला तोही अर्धाच. काय रे देवा तू ह्या मोबाईल कंपन्यांशी टाय-अप केलास का? मग काय अगदी पायाला लोखंडाचा गोळा बांधल्यासारखा चालत घरी गेलो. नशीब घराची किल्ली माझ्या जीन्सच्या खिशात होती नाहीतर सकाळचे दूध घरी मलाच घ्यावे लागले असते .घरी सगळे झोपलेले होते आलो गपचूप रूम मध्ये गेलो अंग पुसले अन झोपून गेलो. असं वाटत होते एक-दोन आठवड्यांसाठी कोमात जावं पुन्हा शुद्धीवर यावं अन डोळे उघडताच पहिले दृश्य दिसावं ते म्हणजे वैदेहीचा गोंडस चेहरा, पण आमचं नशीब दरवेळी प्रमाणे पांडू... गाढ झोप लागली अन चक्क दुस-या दिवशी दुपारी चारला जाग आली आणि खर सांगतो डोळे उघडताच चक्क वैदेही समोर.....

good morning my prince charming... आपल्यासाठी गरम गरम चहा खास आमच्यातर्फे. 'अगं पण दुपारचे चार वाजले आहेत ना ,मग काय झाले आपल्या दिवसाची सुरूवात दुपारच्या गरम चहा ने केली तर काय बिघडते. lets just enjoy our cup of tea. ' नेहमीच मला ही गप्प करत असते.' मी पलंगावरून उठून बसत होतो आणि बाईसाहेब समोर बसल्या होत्या, तिला विचारले आई कुठे गेली ....मला ओरडली.. 'गधड्या आहेस कुठे... काकू गेल्या ना दोन दिवसांपूर्वीच गावी'....

दोन दिवस मी कोमा मध्ये होतो की काय....



मी स्वतःच स्वतःशी पुटपुटत होतो वैदेही ते बघत होती . मग मी हलक्या आवाजात विषय काढला. वैदू त्या दिवसाबद्दल [illegible]....
'गप्प वेड्या मी विसरली ते सर्व. पण आपण आता आपले सगळे discussions तुझ्या घरीच करत जाऊ.तसपण काकू एका महिन्यासाठी गावी गेल्या आहेत , आईने तशी चिठ्ठि माझ्यासाठी ठेवली होती अन ती माझ्यापर्यंत पोचली का नाही देवास ठाऊक.....

'मग वैदूबाई (लहानपणापासून तिला ठेवलेले माझे सर्वात आवडते नाव) दोन दिवसात काय केलं आपण..'हम्म साहेब आम्हाला तुमच्याशी आज भरपूर महत्त्वाचे बोलायचे आहे. आपणास काही कधी बोलायला जमतच नाही नेहमी आम्हालाच पुढाकार घ्यावा लागतो....
सरतेशेवटी आमचे बोलणे होणार होते....

'अद्वैत (आज चक्क अद्वैत!!!) मला गेल्या कित्येक दिवसांपासून तुला काहीतरी सांगायचे होते पण घटना अश्या घडल्या की काही जमलेच नाही, आज वेळ अन संधी दोन्ही कश्या एकत्र चालून आल्या आहेत त्यामुळे आजच आपल्याला बोलायला हवं...

बोल डियर मी तुला ऐकतोय.....'तू कधी धाडस केलं नाहीस आणि करणारही नाहीस पण अद्वैत मला तू लहानपणापासून आवडत होतास आणि अजुनही आवडतोस पण तू तुझ्या आयुष्यात इतका गडबडलेला असतोस की दर वेळी मलाच तुला सांभाळावं लागते पण मला त्याचे काही वाटत नाही. तू माझ्यासाठी आपल्या माणसासारखा आहेस त्यामुळे मला बरं वाटते. पण आता काही प्रसंग असे घडले आहेत त्यामुळे आपल्या ह्या अनामिक नात्याला आता नाव द्यायला हवं.'
'अनामिक!! : 'वैदू पण मग एवढं सगळं असताना अनामिक का?'........



'वैदू पण मग एवढं सगळं असताना अनामिक का?' वेडा कुठला .. .बर घे मीच बोलते आता.....

'अद्वैत, from last 9 years i have fallen in love with you .' आपलं प्रेम अव्यक्त होते पण आज मला ते तुझ्याजवळ व्यक्त करणे गरजेचे वाटते कारण तू मला हवा आहेस एक मित्र म्हणून नव्हे तर कायमचा एक जीवन साथी म्हणून ... मला खात्री आहे तू मला नाही म्हणणे शक्य नाही पण..... पण....

'आई बाबांनी माझे लग्न सुधीरशी ठरवले आहे.....

'काय!!!!!!'

मग पण सुधीर आधीच एका मुलीसोबत commited आहे न.आपण आठवतय त्य दिवशी त्याला बघितले होते. मग तुझे लग्न त्याच्याशी होणे कसे काय शक्य आहे. 'नशीब आणि बाप्पा या दोघांचा माझ्याशी काय खुन्नस आहे ते त्या बाप्पालाच ठाकक. एवढं सगळं घडलं माझे मलाच माहित नाही, पण मी एवढा दोन दिवस झोपून राहीलो तरी कसा. मला तर काहीच झाले नव्हते. मग दोन दिवसांचे अंतर पडले तरी कसे अन दोन दिवसांत इतके सारे कसे काय घडू शकते,' वैदेहीने मला जोरात चिमटा काढला, 'hello are you listening to me , मूर्ख माणसा.' (गडबडलेल्या अवस्थेतून स्वतःला सावरत) 'हह.....हो.....बोल मी ऐकतोय. वैदू मला कसं सांगाव हेच कळत नव्हते. पण मला ही तू खूप आवडतेस गं' .
'राहू देत...राहू देत....भावनापण तुमच्या लेट करंटच आहेत'.



आयुष्यात इतके झटके लागले ना मला की एका ईलेक्ट्रिशीयनला पण वायरिंग चे काम करताना  लागले नसावेत, खरच माझं आयुष्य खूप इलेक्ट्रिफाईंग आहे असं म्हणायला हरकत नाही.पण सुधीर बद्दल वैदेहीने तिच्या घरातल्यांना अजुन सांगितले का नाही ?. म्हणून मीच तिला मुद्दामुन विचारले.'अग तुला सुधीरबद्दल आता सगळं माहित आहे ना मग आई-बाबांना सांगून टाक ना आजचं'.' वेडया माझ्या सांगण्याशिवाय माझ्या घरचे माझे लग्न लावू शकत नाहीत आणि माझे काही सुधीर बरोबर लग्न ठरले नाहीए.' 'कसला तो डोम-कावळा सुधीर, त्याच्याशी मी लग्न करीन... .स्वप्नात असला थांदरट विचार येणे शक्य नाही रे'.'मी तर तुझ्या कडणं भावना व्यक्त होतात की नाही हे जाणून घेण्यासाठी हे सगळं केलं अन मला जे हवं होते तेच मिळाले...

'हा काय प्रकार आहे वैदेही.....तू तर माझी विकेटच काढलीस.' 'sorry  रे राजा, मला तुला दुखवायचे नव्हते पण तू तुझ्या भावना व्यक्त करतच नव्हतास. आणि शाहण्या मला काहीच कळत नाही असं म्हणायच आहे का तुला, तुझं माझ्यावर किती प्रेम आहे तू मला सांगायची गरज नाही पण तू तुझ्या माझ्याबद्दलच्या भावना स्वतःहून व्यक्त कराव्यास हे मला पाहायचे होते पण तिथेही तू माझा पचका केलास. 'असो... आता तू माझ्या मस्त तावडीत सापडलास....बघतेच मी तू त्या विशाखाशी कसा बोलतोस ते.' 'माझे माय मला त्य विशाखामध्ये काडीचा रस नाही...हम बस अब आपकेही है.' आता थोडा जीवात जीव आला......


**addy,** तुला सांगू मला माझ्या आयुष्याकडून जास्त अपेक्षा नाहिएत. जे माझ्याकडे आहे त्यातच खूष राहणारी मुलगी आहे मी. पण तू एक आहेस ज्याच्यशिवाय मी खूष राहणे अशक्य आहे. आपल्या इतक्या वर्षाच्या मैत्रीतून मला इतक्या सुंदर आठवणीं मिळाल्या आहेत त्या मी तुझ्यासोबत असताना अन मी गेल्यावर सुद्धा त्या तश्याच जीवंत राहतील आणि तिच्या डोळ्यातून टचकन पाणी आले. अलगद येऊन मला मिठी मारली आणि रडू लागली.....



मला कुठे काय आणि कसं बोलू कळत नव्हते   मी गप्पपणे एकएक प्रसंगाला झेलत होतो पण बर देखील वाटत होते म्हणा.मलाही काही सुचत नव्हते तेव्हा... मग तिचे डोळे पुसले आणि म्हणालो चला आजचा दिवस खूप छान आहे चल celebrate करूया.

दोघेही मग हसायला लागलो. इकड-तिकडच्या गप्पा चालू होत्या. ती तशी तयार होऊनच आली होती मला बाहेर घेऊन जाण्यासाठी मीच आपला गबाळ्यासारख्या अवतारात होतो. मग मी पण फ्रेश होऊन  तयार झालो. संध्याकाळ झाली होती . जवळपास सहा वाजले असावे. बाहेर ढगाळ वातावरण होते पण  पाऊस नव्हता मग मी तिला म्हणालो चल ग्रीन पार्कला जाऊ आज तुला माझ्याकडून ट्रीट. ती पण खुष  होऊन म्हणाली 'चला आज तुला मला मस्त कापायला मिळणार'. मग मी बाईक काढली अन आम्ही होटेलाकडे जायला निघालो. जेव्हा बाईक चालू करत होतो तेव्हा मी आकाशाकडे पाहिले. काळे ढग जमा  होत होते.....काही अर्थ लागतो का ह्या काळ्या ढगांचा याचाच विचार करत होतो मी तितक्यात वैदेही  आली अन मागनं धक्का देत म्हणाली 'अहो विचारवंत, चला जाऊया'.......

बाईक मेन रोड वरून काढली अर्धा रस्ता पार केला....आणि...अचानक
समोरून एका गाडीने  माझ्या बाईकला धडक
दिली ती गाडी रस्त्यामध्येच आडवी सरकत
येत होती, माझी बाईक त्या गाडीतल्या
ड्राइव्हरच्या बाजूनेच आदळली गाडीत
बघितले तर  सुधीर होता....
मोठा आघात झाला आणि...
वैदेही  सरळ गाडीखाली फेकली गेली ,
माझी बाईकसुद्धा माझ्यासकट बाजुला
झाली अन सुधीरची गाडी भिंतिला जाऊन
आदळली.....



मी बेशुद्ध झालो..........

आयुष्यात इतक्या घटना एकत्र घडतात हे कधी पाहिले नव्हते पण असं अनुभवावे लागेल हे कधी स्वप्नातही बघितले नव्हते. कधी कधी काही गोष्टी न सांगताच अचानक समोर येतात अन जाता जाता भरपूर काही सांगून जातात काय माहित आता अजुन पुढे काय घडणार होते.

'सर्वत्र अंधार होता. डोळे उघडण्याचा प्रयत्न करत होतो पण काही केल्या जमत नव्हते. अचानक डोळ्यासमोर सफेद प्रकाश भडकू लागला. काय होत होते काहीच कळत नव्हते आजुबाजूचा आवाजही ऐकू येत नव्हता, मी कुठे अन कश्या अवस्थेत आहे हे ही मला माहित नव्हते....पुन्हा प्रकाश नाहिसा झाला अन मी बेशुद्ध झालो. थोडया वेळानंतर जेव्हा शुद्ध आली तेव्हा जे मी पाहिले ते कधीच विसरु शकणार नाही. मी एका इस्पितळात पडून होतो हाता-पायांना ड्रेसिंग केलेले होते डोक्याला पण टाके लागलेले होते. आजुबाजुला पाहिले सर्व रुग्ण माझ्याकडे एखाद्या नव्या पाहुण्याप्रमाणे पाहत होते. पण मी फक्त एकच विचार करत होतो...वैदेही कुठे आहे.....

कसातरी त्या पलंगावरुन उठलो . लंगडत लंगडत पॅसेज मध्ये आलो . कुठे जाऊ कोणाला विचारु काहीच कळत नव्हते. शेवटी एक डॉक्टर आले . त्यांना मी विचारण्याचा प्रयत्न करत होतो , खूप काही विचारायचे होते पण तोंडाने बोलणे जमतच नव्हते तरी सुद्धा जोर केला आणि विचारले 'डॉक्टर....माझा अपघात झाला मला इथे कोणी आणले अन माझ्यासोबत एक मुलगीही होती तिचे काय झाले कुठे आहे ती.' सुरुवातीला डॉक्टर काही बोलले नाहीत . त्यांनी मग एका नर्सला हाक मारली . 'नर्स ह्यांना त्यांच्या वार्ड मध्ये घेऊन जा, मिस्टर अद्वैत मी येतोच आपण तुमच्या वार्ड मध्ये जाऊन बोलू तुमच्या शरीरात रक्त खूप कमी आहे तुम्हाला आराम करायला हवा . 'डॉक्टर..... ...वैदेही कुठे आहे मला तिला भेटायचे आहे आत्ताच्या आत्ता मला तिच्याकडे घेऊन चला.'

डॉक्टरने काहीच उत्तर दिले नाही . नर्स मला माझ्या वार्ड मध्ये घेऊन गेली मी तसाच वैदेहीचा विचार करत पडून होतो, काही वेळानंतर डॉक्टर आले त्यांनी मला तपासले अन नर्सला काही औषधे लिहून दिली.... खूर्ची घेऊन माझ्याजवळ बसले . 'हेल्लो.. मी शिरिश गुंजाळ, तुमची केस मीच पाहतोय.' तासाभरापूर्वी तुमची केस खूप क्रिटिकल होती रक्तस्त्राव भरपूर झाला होता आम्हाला असेच वाटत होते की तुम्ही जगता की नाही... पण आमचे प्रयत्न यशस्वी ठरले आणि तुम्ही वाचलात..........



‘डॉक्टर.....पण मी एकटा नव्हतो , माझ्यासोबत एक मुलगी देखील होती‘.त्यांनी काही उत्तर दिले नाही आणि थोडावेळ माझ्याकडे तसेच बघत राहिले. अन म्हणाले ‘पण ज्या लोकांनी तुम्हाला आणले ते तर म्हणाले की त्यांना फक्त तुम्हीच दिसलात जखमी अवस्थेत बाकी कोणीच नव्हते तिथे. ‘मी त्यांचे बोलणे मान्य करण्यास तयारच होत नव्हतो

‘हे कसं शक्य आहे माझा जेव्हा अपघात झाला तेव्हा मी शुद्धीवर होतो. अपघात स्थळी मी होतो माझी मैत्रीण होती अन ज्या गाडीशी अपघात झाला त्या गाडीत एक माणूस होता.

meanwhile..... त्या इस्पितळात एक माणूस आला आणि त्याच्या मागोमाग पोलीससुद्धा आले . त्या माणसाने दोन मृतदेह आणले . पाठोपाठ पोलीस चौकशी करत होते आजुबाजुच्या वॉर्डबॉला विचारपूस करत होते.....‘इकडचे इनचार्ज कोण आहेत त्यांना ताबडतोब बोलवा......

जेव्हा मी त्या दोन मृतदेहांबद्दल ऐकले तेव्हा मी दचकलो. शरीर थरथर कापायला लागले , जणू काही क्षणातच मी गोठणार होतो. पण आयुष्यात प्रत्येक प्रसंगाला सामोरे तर जावे लागते,त्यात आवडता नावडता असा काही प्रकार नसतो. लंगडत लंगडत मी डॉक्टरसोबत कसातरी जीवात जीव आणून त्या पॅसेज मध्ये गेलो . तिकडे वेगळाच गोंधळ उडाला होता. पोलीस विचारपूस करत होते : ‘ हे दोन मृतदेह कोणाचे आहेत ‘डॉक्टर उत्तरले, काही वेळापूर्वी मेन रोडवर एक मोठा अपघात झाला तेव्हा हे दोघेही त्या घटनास्थळी असावेत असा अंदाज त्यांनी सांगितला. तेव्हा पोलीस म्हणाले ‘ह्या दोन बॉडया आहेत त्यातली एक मुलगी आहे आणि एक मुलगा.‘ जेव्हा मी हे वाक्य त्या इन्स्पेक्टर कडून ऐकले तेव्हा माझी अवस्था एखाद्या तुटणा-या हिमनगा सारखी झाली. डॉक्टरने त्या दोन्ही मृतदेहांवरची चादर काढली......

‘ते मृतदेह वैदेही आणि सुधीरचे होते....‘



माझ्यातला हिमनग पूर्णतः तुटला. अश्रूही आता गोठले होते असं वाटत होते. पण तरीसुद्धा मला रडू येत होते वैदेही तिच्या आई-वडिलांची एकुलती एक मुलगी होती. पोलीसांनी तिच्या आई-वडिलांना तातडीने इथे यायला सांगितले. पोलीसांनी मला त्या अवस्थेत पाहिले तेव्हा ते माझी सुद्धा चौकशी करु लागले .'तुम्ही ह्या मुलीचे कोण लागता?'पहिला प्रश्न, 'हा अपघात कसा झाला?' - दुसरा प्रश्न..... काही उत्तर देणार आहात की नाही. 'हो हिचे नाव वैदेही मुजुमदार ती माझी मैत्रीण होती, अपघात व्हायच्या आधी आम्ही दोघे बाहेर निघालो होतो बाईक चालवत असताना अचानक आमच्या बाईकला ही गाडी येऊन धडकली अन त्यात वैदेहीचा अपघात झाला आणि मी माझ्या बाईकसकट बाजूला फेकलो गेलो त्यानंतर मला काही आठवत नाही

'पोलीस म्हणाले ही मर्डर केस झाली असती पण तुमची साक्ष स्पष्ट सांगत आहे की हा निव्वळ अपघात होता त्यामुळे आम्ही आमचे तपासकार्य थांबवत आहोत, तुमच्या झालेल्या नुकसानाबद्दल आम्ही मनापासून क्षमस्व आहोत.' त्याला काय माहित माझं किती नुकसान झाले होते ते. तेवढयात वैदेहीचे आई-वडील आले त्यांना खूप मोठा धक्का बसला मी तसाच माझ्या बेदुरुस्त अवस्थेत त्यांच्यासमोर त्यांना बघत उभा तो तेव्हा काकू जवळ आल्या आणि म्हणाल्या 'बाळ कसा आहेस तू-माझ्या तोंडून काहीच शब्द फुटत नव्हते, मी पुन्हा बेशुद्ध झालो. नर्स ने मला माझ्या त्या बेशुद्ध अवस्थेत माझ्या वॉर्ड मध्ये नेले.

विशाखा त्या गाडीत का नव्हती? ती तेव्हा कुठे असेल? तिला सुधीर बद्दल कळाले असेल का ? तिला काय वाटेल जेव्हा तिला सुधीर बद्दल कळेल (न जाणे हा प्रश्न माझ्या मनात का आला) पण हे सगळे प्रश्न मला शुद्धीवर आल्यावर पडले होते. पोलीसांनी सुधीरच्या आईला बोलवले होते(सुधीरला फक्त आईच आहे कारण त्याचे वडील तो लहान असतानाच गेले होते). सुधीरच्या पाकिटात विशाखाचा फोटो होता आणि तिचे कार्ड होते त्यावरुन त्यांनी तिला कळवले . विशाखा तेव्हा चक्क अर्ध्या तासात तिकडे हजर झाली , ती सुद्धा त्या धक्क्यातून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करत होती पण तिलाही रडू आवरत नव्हते मी तिकडे असा पडून होतो त्यामुळे तिला आधारही देऊ शकत नव्हतो. तेव्हा विशाखा थेट माझ्याकडे धावत आली.तिचा पहिला प्रश्न ऐकूनच मी पुन्हा बेशुद्ध झालो .....





'सुधीर आता आपल्यात नाहीए ना ?......'

पुन्हा जेव्हा मला शुद्ध आली तेव्हा मी इस्पितळात नव्हतो. डॉक्टरांनी मला डिस्चार्ज दिला होता, माझा पाय बरा झाला होता. डोक्याला मार लागल्यामुळे सारखा बेशुद्ध पडायचो पण आता तेही बंद झाले होते. दोन्ही मृतदेहांचे अंतिम संस्कार करण्यात आले होते. तो अपघात होऊन पाच महिने लोटले होते. पण मी अजुनही विशाखाला....नाही वैदेहीला विसरू शकत नव्हतो. पण वैदेहीच्या आधी सारखे विशाखा हे नाव माझ्या तोंडावर आज का येत होते. आई सुद्धा अपघाताचे कळल्यावर एका आठवड्यातच घरी परत आली. ती नसताना विशाखाच सगळं माझं बघायची अस आईने मला सांगितले होते. आता ह्या विशाखाचे मी काय करू. तिनेही तिचं आपलसं कोणीतरी गमावले होते अन मी सुद्धा पण तिच्या चेह-यावर मी तरी शुद्धीवर आल्या पासून माझ्याबद्दल वाटणारी काळजी आणि ओठावर हसू पाहतोय.

खरच आता ह्या विशाखाचे मी काय करु.....

६ महिन्यांचा काळ कसा निघून गेला माझे मलाच कळाले नाही. तरी सुद्धा एक **complicated** प्रवास थांबला होता ह्या विचारानेच मी सुखावलो होतो. आता मी पूर्णपणे बरा झालो होतो. विशाखाही सावरली होती. पण हल्लीच्या काळात काही बदललेले होते....'विशाखा मला आवडायला लागली होती!!!!' तिच्याकडनं कधी काही तसे लक्षात नाही आले पण ती मला आवडायला लागली होती . गेले सहा महिने नुसते तेच तेच विचार करून अक्षरक्ष: पकलो होतो. आई ने नवीन स्वप्नं पाहायचे सोडूनच दिले होते अन मी विचार करणे.

पण विशाखा..... तो प्रश्न अजुनही अनुत्तरीतच .



काही दिवस असेच लोटले अन शेवटी तो दिवस उगवला . कोणता??? मला विशाखाला त्या प्रश्नाच उत्तर विचारायचं होतं. आमच्या भेटी अलिकडच्या काळात खूप वाढल्या होत्या. ठिकाण???? 'ग्रीन पार्क' कसं विसरू शकतो मी , पूर्वी विशाखा आणि मी तिकडे वेगवेगळे जायचो उरलेल्या आठवणी एकांतात बसून पुसण्यासाठी आज आम्ही तेच दोघं तिथे जातो वेळ घालवण्यासाठी...... एकत्र, सही ना.... तिच्या चेह-यावर आज एक वेगळीच चमक दिसत होती, असे वाटत होते की तिलाही माझ्याकडून खूप दिवसांपासून काहीतरी ऐकायचं होतं...

सुरुवात तिनेच केली..(मी मनातल्या मनात सुटकेचा निःश्वास टाकला) 'तुला काही विचारायचे आहे ना.....मग विचार ना...' मी जो क्षण इतका वेळ टाळत होतो तोच क्षण नेमका आला.... 'अग....काही नाही... मला तुला विचारायचे होते खूप दिवसांपासून...की.....' ' माझ्याशी लग्न करशील का?'

'अखेर'..... ह्या कहाणीचा शेवट काय असेल तुम्हाला कळलेच असेल....पण कथेला शेवट हा हवाच नाही का.....



– 'अखेर'..... ह्या कहाणीचा..
अन सुरुवात एका नव्या वाट्चालीची!!!

# साहित्य प्रतिष्ठान

## ई साहित्य प्रकाशन
## आजवरची प्रकाशित ई-पुस्तकं

टल्लीची शाळा : टल्ली
मकरंदची त्रिवेणी : कवी मकरंद सावंत , मुंबई
ग्रेव्हयार्ड लिटरेचर : कवी प्राजक्त देशमुख ,नाशिक
तो आणि ती : मयुरेश कुलकर्णी , दक्षिण आफ्रिका
प्रियेचे अभंग : कवी रमेश ठोंबरे , औरंगाबाद
चार क्षण : संतोष नार्वेकर, मुंबई
देशी दारुचे दुकान : लेखक धुंद रवी , पुणे
ई शाळा : मराठी कसे लिहावे : भारती सरमळकर, मुंबई
तो मी आणि सिगरेट : कवियित्री स्वप्ना कोल्हे , नाशिक
मोरया : संकलन : वैशाली कुलकर्णी , अमृता ढगे, अंबरनाथ, ठाणे
लोकल गोष्टी : स्वाती फडणीस ,मुंबई
मीरा : कवी प्राजक्त देशमुख , नाशिक
ओथंब : मंजिरी दाभोळकर , मुंबई
सावळ्या मुलीची गाणी : तुषार जोशी , नागपूर
सईची वही : सुप्रिया जाधव जोशी , नाशिक
एक होते राजे : कवी  मयुरेश कुलकर्णी
अहम् ब्रम्हास्मी : स्वा. अहम् ब्रम्हास्मी

: ई साहित्य प्रकाशनची इतर विनामुल्य ई-साप्ताहिके :
ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी, दुर्ग दुर्गट भारी

# साहित्य प्रतिष्ठान

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन साहित्य पुरविण्याच्या
ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास 'नेटाक्षरी' जोमाने पार पाडत आहे.
दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह
द्विगुणीत होतोय, नेटाक्षरी हे साप्ताहिक ई-पुस्तक सध्या सुमारे
९०००० मराठी रसिकांना विनामुल्य वितरीत केला जातो.
त्या व्यतिरिक्त वेबसाईट व्हिजिट करून वाचण्या-यांची संख्या
लक्षणीय आहे. हे ई-पुस्तक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड
करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना
आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू.
मराठी साहित्याची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा
ही इच्छा. आपल्यासारख्या रसिकांच्या सहाय्याने हे ई-पुस्तक
लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहोचवण्याचा
आमचा संकल्प सिद्धीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

साहित्य प्रतिष्ठान